# शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद.

## रेल्वेस्टेशन जवळ, पैठण रोड, औरंगाबाद-४३१ ००५.

## सरळसेवा भरती गट-ड

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन लेखी व मौखिक मुलाखतीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज सदर जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत अर्ज सादर करावेत. उमेदवारांनी त्यांचे अर्ज शेवटच्या दिनांकापर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोस्टाव्दारे अथवा हस्तपोचव्दारे शेवटचा दिनांक व वेळेपूर्वी सादर करावेत.

**सरळसेवा भरतीने भरणेसाठी घोषित पदे :-**

| अ.क्रं | पदनाम वेतनबँड व ग्रेड वेतन | आवश्यक शैक्षणिक अर्हता | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | दप्तरी<br>रू. ४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रु.१६००/- | इय्यता ९ वी उतीर्ण<br>(मराठी विषयासह) | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| २ | पहारेकरी<br>रु.४४००-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१३००/- | इय्यता ५ वी उतीर्ण<br>(मराठी विषयासह)<br>सदृढ व मजबूत शरीरयष्टी रात्रपाळीत काम करण्याची क्षमता. माजी सैनिक उमेदवारांना प्राधान्य. | १ | १ | - | १ | - | - | - | २ | २ |
| ३ | मजदूर<br>रु. ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१३००/- | इय्यता ५ वी उतीर्ण<br>(मराठी विषयासह)<br>सदृढ व मजबूत शरीरयष्टी. अवजड कामे करण्याची शारिरीक क्षमता | - | - | - | - | - | - | - | १ | ३ |
| ४ | आवेष्ठक<br>रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१८००/- | इय्यता ९ वी उतीर्ण<br>(मराठी विषयासह)<br>नामांकित व मोठया संस्थेत पॅकिंग कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य. | - | - | - | - | - | - | - | १ | - |

**उमदेवारांना महत्त्वाच्या सूचना-**

१ अर्ज व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, रेल्वेस्टेशनजवळ, पैठण रोड, औरंगाबाद-४३१ ००५. या पत्त्यावर पाठवावे. पोस्टाने पाठविलेल्या पाकिटावर पदावा स्पष्ट उल्लेख करावा.

२ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हतेविषयी तसेच जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैद्यता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडव्यात.

३ विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरलेला असावा. अपुर्ण माहिती व अपुर्ण कागदपत्रे जोडलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदारशी नंतर कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. पात्रताधारक उमेदवारांना लेखी/माखिक मुलाखतीचा दिनांक, स्थळ व वेळ यथावकाश कळविण्यात येईल.

४ अर्जामध्ये पदाचं नांव, स्वतःचे पूर्ण नांव, पत्ता, जन्मदिनांक जात पोटजात, शैक्षणिक अर्हता, पूर्व अनुभव नमुद करावा. अपुर्ण भरलेले अर्जांचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी अर्जावर अलिकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो जोडुन त्यावर स्वाक्षरी करावी तसेच एक अतिरिक्त फोटो अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इमाव या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांने दिलेले दिनांक ३१-०३-२०१३ अखेर वैध असलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबंधित आरक्षणाचा लाभ दिला जाईल, अन्यथा दिला जाणार नाही. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१-३-२०१३ नंतरचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

६ शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०,दि.२७ जून २०११ नुसार ज्या परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

७ दिनांक १-१२-२०१३ रोजी उमेदवाराचे वय- खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा किमान १८ ते कमाल ३३ वर्षे , तसेच मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा किमान १८ ते कमाल ३८ वर्षे.

८ पोष्टाव्दारे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच टपालाने उशिरा प्राप्त होणा-या अर्जासाठी हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

९ शासन अधिसूचना एसआरव्ही-२०००/प्र.क्रं.(१७/२०००)/१२, दिनांक २८-३-२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहाण कुटुंबाचे प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे आवश्यक.

१० शासन निर्णय क्रमांक अनिया-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१-१०-२००५ अन्वये निवड झालेल्या उमेदवाराला परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

११ शासकीय/निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांना नियुक्ती प्राधिका-यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२ आवेष्ठक व मजदूर पदाची कर्तव्ये ही मुद्रणालयातील अवजड कामाशी निगडीत असल्याने सदर पदासाठी केवळ पुरुष उमेदवारांनीच अर्ज सादर करावेत. तसेच कारखाने अधिनियमानुसार पहारेकरी पदाची कर्तव्ये ही २४ तास पाळी बदलाने असल्यामुळे, सदर पदासाठी सुध्दा केवळ पुरूष उमेदवारांनीच अर्ज सादर करावेत.

१३ शासकीय मुद्रणालयातुन शिकाऊ उमेदवारी कोर्स पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील.

१४ अधिसूचित करण्यात आलेले रिक्तपद ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, केवळ त्याच प्रवर्गातील उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील, इतर प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज केल्यास, त्यांचे अर्ज रदद ठरविण्यात येतील व त्यांबाबत त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच इतर कारणामुळे अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदार उमेदवारांशी सुध्दा कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५ निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणणा-या उमेदवारांची, उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

१६ अधिसूचित करण्यात आलेल्या पदासाठी ७५ गुणांची लेखी व २५ गुणांची मौखिक/तोंडी मुलाखत घेण्यात येईल. लेखी परिक्षेत गुणवत्तेनुसार प्रथम आलेल्या ५ उमेदवारांना मौखिक/तोंडी मुलाखतीस बोलाविण्यात येईल. लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वःखर्चाने यावे लागेल, त्यासाठी कोणताही प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

१७ उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन व फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तो भरतीसाठी अपात्र ठरेल तसेच उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झाली असल्यास, त्याबाबतचा तपशिल अर्जासाबत सादर करणे आवश्यक आहे.

१८ सदर जाहिरात व **अर्जाचा नमुना** महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या http://ese.mah.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

१९ भरती प्रक्रिये अंतर्गत कोणत्याही स्तरावर बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद तथा अध्यक्ष गट-ड निवड समिती, यांना राहतील. यासंदर्भात कोणासही कोणत्याही स्तरावरुन वाद उपस्थित करता येणार नाही.

व्यवस्थापक
तथा अध्यक्ष निवड समिती वर्ग-ड
शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद.

# अर्जाचा नमुना

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
रेल्वेस्टेशनजवळ, पैठणरोड,
**औरंगाबाद-४३१ ००५.**

| अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वतःचा फोटो येथे चिकटवून त्यावर अर्जदाराने स्वाक्षरी करावी. |
|---|

**विषयः........................................ पदासाठी अर्ज.**
(पदाचा स्पष्ट उल्लेख करावा)

संदर्भः................................................

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी सरळसेवा प्रवेशाने .............................. या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन, या पदासाठी निवड होण्याकरीता खालीलप्रमाणे विहित नमुन्यात अर्ज सादर करीत आहे.

१. संपूर्ण नांव (आडनांव प्रथम लिहावे ) ..............................................................

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ताः ..............................................................

भ्रमनध्वनी क्रमांक ................................... ई-मेल आयडी ...................................................

अर्जदाराचा जन्मदिनांक (अंकामध्ये)

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दिनांक १.१२.२०१३ रोजी अर्जदाराचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

अर्जदाराचा जन्मदिनांक (अक्षरात) ...................................

४. अर्जदार मागासवर्गीय आहे काय ? होय/नाही ☐

अ) मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा ☐

ब) अर्जदार ज्या प्रवर्गाकरिता अर्ज करीत आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. ☐

क) अर्जदार उन्नत व प्रगत गटात मोडत आहे काय ? होय/नाही ☐

(उमेदवार इमाव, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या या प्रवर्गातील उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक)

५. अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी (डोमीसाइल) आहे काय ? होय/नाही ☐
(असल्यास रहिवासी दाखला सोबत जोडावा)

६. राष्ट्रीयत्वः ......................

७. अर्जदाराची शैक्षणिक अर्हताः

| अ.क्र | उत्तीर्ण केलेली परीक्षा | शाळा/महाविद्यालय/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेल्या गुणाची टक्केवारी | वर्ग/श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

८. अनुभव असल्यास सविस्तर तपशिल खालील तक्त्यात नमुद करावा.

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे/ कार्यालयाचे नाव | पद | कालावधी (पासुन ते पर्यंत ) | अनुभवाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अर्जदाराचे नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केली आहे काय ?

असल्यास नोंदणी कार्यालयाचे नाव ........................ नोंदणी क्र............................ दिनांक / /

१०.अर्जदार विवाहीत आहे काय ? होय/नाही

विवाहीत असल्यास हयात मुलांची संख्या

उमेदवाराची स्वाक्षरी

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले विभागातील (पदाचं नाव )................या संवर्गातील पदे भरणे संबंधित जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असे प्रमाणित करतो/करते की, अर्जामध्ये दिलेली माहिती बरोबर आहे. त्या पृष्टयर्थ मी प्रमापत्राच्या सांक्षाकित प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी या पदासाठी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. तसेच नोकरीवर हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. याबाबत निवड समिती /नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही किंवा उपस्थित राहणार नाही.

(उमेदवाराची स्वाक्षरी व संपुर्ण नाव)

**प्रमाणपत्र**
**नमुना अ**
**(नियम ४ पहा)**

मी, श्री. /श्रीमती / कुमारी ..................................................................
श्री.................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ......................................... वर्ष, राहणार
.............................................................. याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी .............................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ...........................(संख्या) इतकी हयात मुले आहे, त्यापैकी दि.२८ मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या..............आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.) जन्म दिनांक.....................
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण:
दिनांक:

अर्जदाराचे नाव...............................

दिनांक १४-११-२०१३

**सूचना-**

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील रिक्तपदांसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २४-११-२०१३ हा राहील.

व्यवस्थापक

शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद.

# शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद.

**रेल्वेस्टेशन जवळ, पैठण रोड, औरंगाबाद-४३१ ००५.**

**सरळसेवा भरती गट-ड**

**शुध्दीपत्र-जाहिरात**

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील पदांच्या भरती संदर्भात दिनांक ९-११-२०१३ रोजी दैनिक लोकपत्र व दैनिक १०-११-२०१३ रोजी दैनिक मुंबई चौफेर या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील पहारेकरी व मजदूर या पदासाठीच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी खालील मजकूर या शुध्दीपत्र जाहिराती अन्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सरळसेवा भरतीने भरणेसाठी घोषित पदे :-** दप्तरी

| अ.क्रं | पदनाम वेतनबँड व ग्रेड वेतन | आवश्यक शैक्षणिक अर्हता | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पहारेकरी<br>रु.४४००-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१३००/- | इय्यता ४ थी उतीर्ण<br>(मराठी विषयासह)<br>सदृढ व मजबूत शरीरयष्टी रात्रपाळीत काम करण्याची क्षमता. माजी सैनिक उमेदवारांना प्राधान्य. | १ | १ | - | १ | - | - | - | २ | २ |
| २ | मजदूर<br>रु. ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१३००/- | इय्यता ४ थी उतीर्ण<br>(मराठी विषयासह)<br>सदृढ व मजबूत शरीरयष्टी. अवजड कामे करण्याची शारिरीक क्षमता | - | - | - | - | - | - | - | १ | ३ |
| ३ | दप्तरी<br>रू. ४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रु.१६००/- | इय्यता ४ थी उतीर्ण<br>(मराठी विषयासह) | - | - | - | - | - | - | - | - | १ |

दिनांक ९-११-२०१३ रोजी दैनिक लोकपत्र व दिनांक १०-११-२०१३ रोजी दैनिक मुंबई चौफेर वर्तमानपत्रातील दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन यापूर्वीच उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. वरील पदांसाठी इय्यता ४ थी उतीर्ण शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी, त्यांचे अर्ज दिनांक ३०-११-२०१३ या अखेरच्या दिनांकास सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, रेल्वेस्टेशनजवळ, पैठण रोड, औरंगाबाद या पत्त्यावर पोस्टाने पाठवावेत किंवा हस्तपोचव्दारे आणुन द्यावेत. दिनांक ३०-११-२०१३ नंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

तसेच उमेदवारांना महत्त्वाच्या सूचना मध्ये खालील बाब अंतर्भुत करण्या येत आहे.

सूचना क्रमांक २० भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

व्यवस्थापक
तथा अध्यक्ष निवड समिती वर्ग-ड
शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद.